**CNR No. MHDH040001642021**
**नियमित दिवाणी दावा क्र.४/२०२१**
शिवाजी भिका पाटील विरुध्द
नागेशवर शिवाजी पाटील व इतर

## निशाणी क्रमांक ५ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ प्रमाणे दाव्याचा अंतिम निर्णय होईपावेतो तुर्तातुर्त मनाई हुकुम मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र. १ याने नि. १३ आणि प्रतिवादी क्र. २ याने नि. १६ वर त्यांचा खुलासा दाखल केलेला आहे.

२. अर्ज व खुलाशाचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादींच्या वकीलांचे युक्तीवाद ऐकले. वादी व प्रतिवादींच्या परस्पर विरोधी कथनांवरुन खालील मुद्दे काढलेले असुन त्यावरील निष्कर्ष त्या खालील कारणमिमांसेच्या आधारे नोंदविलेले आहेत.

| मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|
| १. वादीने असे शाबीत केले काय की, त्याच्या म्हणण्यात प्रथमदर्शनी तथ्य आहे ? | नाही. |
| २. वादीने पुढे असे शाबीत केले काय की, न्यायाचा समतोल त्याच्या बाजुने आहे ? | नाही. |
| ३. वादीने पुढे असे शाबीत केले काय की, अर्ज मंजुर न केल्यास त्यांचे कधीही न भरुन येणारे नुकसान होईल ? | नाही. |
| ४. आदेश काय ? | अर्ज नामंजुर करण्यात येत आहे. |

## कारणमिमांसा

**मुद्दे क्रमांक १ ते ३ करिताः –**

३. वादीने सदर दाव्यातील कथन व मागणीच्या पृष्टयर्थ ग्रामपंचायत घर क्र. ५६०, एकुण क्षेत्र ६५९ चौ.फु., चतुःसिमा पुर्वेस – रस्ता, पश्चिमेस – विठ्ठल बुधा पाटील यांचे घर, दक्षीणेस – रघुनाथ दोधा पाटील यांचे घर व उत्तरेस रस्ता येणेप्रमाणे आहेत

(यापुढे या मिळकतीला "दावा मिळकत" म्हणुन संबोधण्यात येईल) चा नमुना नं. ८ चा उतारा व सदर दावा मिळकतीचा ग्रामपंचायत दप्तरी कर भरल्याबाबतची पावती अशी कागदपत्रे दाखल केलेली आहेत. याउलट प्रतिवादी नं. १ याने दावा मिळकतीच्या कर भरल्याच्या पावत्या, विज बिले, भिका बुधा पाटील व निलाबाई भिका पाटील यांच्या मृत्यु दाखल्यांच्या प्रती, फेरफार नोंदवही पत्रक व भुमीअभिलेख आखीव पत्रीका अशी कागादपत्रे दाखल केलेले आहेत.

४. वादीच्या कथनाप्रमाणे दावा मिळकत ही वडीलोपार्जीत असुन महसुल दप्तरी त्याच्या आईच्या नावे आहे. त्याबाबत वादीने दाखल केलेल्या दस्तांचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, वादीने दाखल केलेल्या दावा मिळकतीचा नमुना क्र. ८ च्या उताऱ्यावर वादीची आई निलाबाई भिका पाटील यांचे नांव आहे. तसेच कराच्या पावतीवरुन सदर दावा मिळकत घराचे कर हे सन २०२०–२१ मध्ये वादीच्या आईच्या नावे भरलेले आहे. यावरुन प्रथमदर्शनी दावा मिळकत घर हे वादीच्या आईच्या नावे असल्याचे दिसुन येते.

५. वादीने पुढे कथन केले आहे की, प्रतिवादी क्र. १ हा त्यांचा एकुलता एक मुलगा असुन तो वादीस दावा मिळकतीतुन निघुन जाण्याकरीता दबाव टाकीत असुन त्याचाच एक भाग म्हणुन त्याने वादीस एकटे दावा मिळकतीत राहु देवुन तो भगवान निंबा चव्हाण यांच्या घरात राहण्यास गेला आहे. याउलट प्रतिवादीने कथन केले आहे की, वादी हे त्याचे पिता असुन ते सन १९८५ मध्ये घर सोडुन गावातील परस्त्री सोबत परागंदा झालेला होता. वादी हा सदर दावा मिळकत घरात राहत नसुन तो बाहेर गावी राहतो आणि केवळ त्याचे लहान आजोबा विठ्ठल बुधा पाटील यांच्या सांगण्यावरुन प्रतिवादी विरुध्द प्रस्तुतचा दावा दाखल केलेला आहे.

६. एकंदरीत दोन्ही बाजुंच्या कथनावरुन असे दिसुन येते की, वादी व प्रतिवादी क्र. १ हे दोघेही दावा मिळकत घरात राहत असुन सदर मिळकत त्यांच्या ताब्यात असल्याचे कथन करीत आहे. अशा परीस्थीतीत तुर्तातुर्त मनाई हुकुम देण्यापुर्वी दावा मिळकत ही वादीच्याच ताब्यात आहे अथवा कसे हे सर्वप्रथम पाहणे आवश्यक आहे.

७. वादीने दावा मिळकतीवर त्याचा ताबा दाखविण्याकरिता दावा मिळकतीचा नमुना नं. ८ चा उतारा व कर भरल्याबाबतची पावती दाखल केलेली आहेत. याउलट प्रतिवादी क्र.१ याने देखील त्याचा ताबा दाखविण्याकरिता दावा मिळकतीच्या कर भरल्याच्या पावत्या, विज बिले ईत्यादी कागादपत्रे दाखल केलेले आहेत. सदर दाखल केलेल्या दस्तांवरुन दावा मिळकत ही वादींच्या आई म्हणजेच प्रतीवादी क्र.१ च्या आजीच्या नावे असल्याचे दिसुन येते. परंतु त्यावरुन केवळ वादी हाच दावा मिळकतीत राहत असुन ती त्याच्या ताब्यात असल्याचे स्पष्टपणे दिसुन येत नाही. अशा परीस्थीतीत ज्या ठिकाणी दोन्ही पक्षकारांनी दावा मिळकतीवर ताबा असलेबाबत प्रथमदर्शनी पुरावा म्हणुन दावा मिळकत घराचे कराच्या पावत्या दाखल केलेल्या आहेत. त्याठिकाणी वादीने त्याचे कथन शाबीत करणेकामी त्याव्यतीरिक्त आणि ठोस पुरावा अभिलेखावर आणणे अपेक्षीत आहे.

८. अभिलेखाचे अवलोकन केले असता, असे दिसुन येते की, वर नमुद दस्तांऐवजी आणि दोन्ही पक्षकारांच्या कथनांव्यतिरिक्त इतर कोणताही पुरावा अभिलेखावर दाखल नाही. वादीच्या कथनाप्रमाणे दावा मिळकत ही जर वडीलोपार्जीत असल्यास आणि ती वादीच्या आईच्या नावे असल्यास प्रतिवादीने केलेल्या कथनानुसार आणि वादीतर्फे कोणताही ठोस पुरावा दाखल नसल्याने प्रतीवादी क्र.१ हा देखील वादीचा मुलगा या नात्याने दावा मिळकत घरात राहत असल्याची शक्यता याठिकाणी नाकारता येत नाही. त्यामुळे केवळ वादीच्या तोंडी कथनावरुन दावा मिळकत ही त्याच्याच ताब्यात आहे असे मत काढुन त्याने मागणी केले म्हणुन प्रतीवादी विरुध्द तुर्तातुर्त मनाई हुकुम देता येणार नाही.

९. प्रस्तुतचा अर्ज निकाली काढतांना प्रथमदर्शनी दावा मिळकत ही वादीची ताब्यात आहे अथवा कसे हे पाहणे जरुरीचे असते आणि जर सदर दावा मिळकत ही वादीचे ताब्यात असल्यास व त्याच्या ताब्यास प्रतिवादी हरकत अडथळा करीत असल्यास केवळ तेव्हाच वादीस त्याने मागणी केल्याप्रमाणे मनाईहुकुम देता येवु शकतो. परंतु वादीने दाखल केलेले कागदपत्रे आणि वर नमुद विवांचनेवरुन दावा मिळकतीवर वादीचा परीपुर्ण ताबा असल्याचे प्रथदर्शनी शाबीत होत नाही. त्यामुळे वादीच्या कथनामध्ये प्रथमदर्शनी तथ्य असल्याचे दिसून येत नाही. दाखल कागदपत्रांवरुन वाद मिळकत ही वादीच्या परीपुर्ण

कब्जेउपभोगात असल्याचे सिध्द न झाल्यामुळे वादीचा अर्ज नामंजूर केल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार आहे. तषेच दावा मिळकतीवर वादीचा ताबा आहे हे स्पष्टपणे दिसुन येत नसुन त्यावर प्रथमदर्शनी प्रतिवादीचा देखील ताबा असल्याचे दिसुन येत असल्याने माझे मते न्यायिक समतोल हा वादीच्या लाभात नाही. सबब मी मुद्दे क्र.१ ते ३ चे नकारार्थी उत्तर देत आहे.

**<u>मुद्दा क्रमांक ४ करिताः</u>–**

१०. मुद्दे क्र.१ ते ३ चे निष्कर्षाचा व वरील सर्व कारणांचा विचार करता सदरचा अर्ज नामंजुर होण्यास पात्र आहे. करिता मुद्दा क्रमांक ४ चा निष्कर्ष नोंदविण्यासाठी मी पुढील आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज नामंजुर करण्यात येत आहे.

२. अर्जाचा खर्च दाव्यात समाविष्ठ करण्यात यावा.

Digitally signed by SUJIT AMBADAS RATHOD
Date: 2022.01.06 11:34:47 +0530

( एस. ए. राठोड )

दिनांक – ०४.०१.२०२२ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, दोंडाईचा.

<u>प्रमाणपत्र</u>

मी प्रमाणित करितो की, सदर पी.डी.एफ. संचिकेच्या मजकूरातील शब्द न् शब्द मूळ आदेशाप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नांव | - | बी.एन. थोरात |
| न्यायालयाचे नांव | - | न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग-१, दोंडाईचा |
| पीडीएफ फाईल अपलोड केल्याचा दिनांक. | - | ०४.०१.२०२२ |

स्वाक्षरित/-
लघुलेखक.